Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं//परीक्षा/ 1984
दिनांक : 22 MAY 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पुरवणी परीक्षा जून-जुलै 2025 अतिविलंब/ विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत..**

**संदर्भ** :- राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा-8/1763 दि.22/05/2025 रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जून-जुलै 2025 मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.22/05/2025 रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्रे सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारीत मुदत संपल्यानंतर अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| **अतिविलंब शुल्क मुदत (रु.50/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)** | **विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रु.100/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)** | **अतिविशेष अतिविलंब शुल्क मुदत (रु.200/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)** |
|---|---|---|
| शुक्रवार दि.23/05/2025<br>ते<br>सोमवार दि.02/06/2025 | मंगळवार दि.03/06/2025<br>ते<br>शुक्रवार दि.13/06/2025 | शनिवार दि.14/06/2025<br>ते<br>सोमवार दि.23/06/2025 |

1) सदर आवेदनपत्र उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्याचे अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करुन चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेव्दारे त्याच दिवशी Online पध्दतीने जमा करण्यात यावे. सदर आवेदनपत्र शुल्क मंडळात रोख स्वरुपात स्विकारले जाणार नाही.
2) रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to boad व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राह्य धरण्यात येतील.
3) विभागीय मंडळामध्ये अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारताना त्याचे Status ची खात्री केली जाईल तसेच कनिष्ठ महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विलंबाची यथायोग्य फी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेण्यात येईल.
4) अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काव्दारे आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे.
5) अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काव्दारे आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांची व प्राचार्यांची स्वाक्षरी असलेली प्रिलिस्ट, NEFT/ RTGS व्दारे शुल्क भरणा केलेल्या चलनाची प्रत, फी डिटेल्स व विद्यार्थ्यांच्या याद्या (Excel यादी), विद्यार्थ्याचे हमीपत्र तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत त्वरीत विभागीय मंडळ कार्यालयास सादर कराव्यात.
6) कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**